मसुदा मंजुरीस्तव सादर

सहयोगी वास्तुशास्त्रज्ञ

व.न.र.

मु.नि.

मा.मु.का.अ.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१अ) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२३ मध्ये फेरबदल

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग,
अंधेरी (पुर्व), मुंबई ४०००९३.
दि.08/07/२०२५

## सूचना

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६

क्रमांक जा.क्र. मऔविम/मुनि/P-271298 /२०२५, दि.08/07/२०२५

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण VI च्या तरतुदी लागू होणारे क्षेत्र किंवा इतर जमीन ज्या शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरीत केल्या आहेत, अशा जमिनींकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे) कलम ४०(१अ) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महामंडळ" असा केला आहे) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे पोट-कलम (२) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी-४३२२ /३१४ /प्र.क्र. २५/२०२३ नवि-११ व्दारे उक्त महामंडळाचे सर्वसामावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (CDCPR-२०२३) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा केला

आहे) मंजूरी दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजी दिली असून ती शासकीय राजपत्रात दिनांक १३ जुलै, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच उक्त नियमावली दिनांक १३ जुलै, २०२३ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील माहिती तंत्रज्ञान पार्क, जैव तंत्रज्ञान पार्क, डेटा सेंटर, लॉजिस्टिक्स पार्क, आणि इलेक्ट्रॉनिक क्लस्टर्स या आणि अशा सेवा उद्योगांची राज्याच्या शहरी आणि निम शहरी भागातील वाढती गरज व त्यामुळे निर्माण होणारी आवश्यक मनुष्य बळातील वाढ व त्यांचे करीता लागणाऱ्या इतर आनुषंगिक पूरक सुविधा पुरविणे आवश्यक झाले आहे. सदरील वस्तुस्थितीनुसार सहाय्यभूत सेवांची गरज लक्षात घेता महामंडळाच्या शहरी आणि निम शहरी भागातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये "वॉक टु वर्क" या संकल्पनेवर आधारीत सहाय्यभूत सेवांसाठी सध्या अनुज्ञेय क्षेत्राचे प्रमाणात वाढ करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, वरील विचारात घेता, उक्त महामंडळाच्या संचालक मंडळाने दि. ०९/०५/२०२५ रोजी झालेल्या ४०६ व्या बैठकीत उक्त नियमावलीतील नियम क्र. ४.२.१ मध्ये सुधारणा करणेबाबत ठराव मंजूर केला आहे. वर नमूद ठरावामध्ये उक्त नियमावलीतील नियम क्र. ४.२.१ मध्ये सुधारणा करणेबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) व कलम ४० (३) व कलम ११५ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जनतेकडून आक्षेप व सूचना ३० दिवसांच्या मुदतीत मागविण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्रदान करण्याचे व तद्नंतर विहीत कालावधीमध्ये प्राप्त होणाऱ्या आक्षेप व सूचनांचे अनुषंगाने संबंधितांस सुनावणी देवून त्यावरील अहवालासह सदर प्रस्ताव शासनाकडे मंजूरी करीता सादर करण्याची कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, उक्त महामंडळाच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुरुप उक्त नियमावलीतील संबंधित तरतुदींमध्ये सदर सूचनेसोबतचे 'परिशिष्ट-अ' मध्ये नमूद केल्यानुसार सुधारणा करणे आवश्यक आहे, असे उक्त महामंडळाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आलेला आहे.

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार प्राप्त अधिकारात, उक्त महामंडळ उक्त नियमावलीतील प्रस्तावित फेरबदलावर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी, ही सूचना प्रसिध्द करीत आहे.

सदर फेरबदलावर कोणत्याही सूचना/हरकती असल्यास त्या मुख्य नियोजक, म.औ.वि.म "उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०००९३ यांचेकडे पाठवाव्यात. ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधीत

प्राप्त सूचनांचा सदर फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापूर्वी विचार करण्यात येईल.

ही सूचना, सर्व कार्यालयीन कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीमध्ये खालील कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आली असून, ती https:www.midcindia.org या संकेत स्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची कार्यालये.

१. मुख्य नियोजक, म.औ.वि.म. "उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग, अंधेरी (पुर्व), मुंबई ४०००९३.
२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची सर्व प्रादेशिक व उप विभागीय कार्यालये (या कार्यालयांचे पत्ते महामंडळाच्या उपरोक्त नमूद संकेत स्थळावर उपलब्ध आहे)

मुंबई ९३
दिनांक: ४ /७/२०२५

(अविनाश पाटील)
मुख्य नियोजक,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई ९३

परिशिष्ट -अ

(महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील सूचना जा.क्र. मऔविम/मुनि/ P-२११२१४/२०२५, दि. ०४/०७/२०२५)

प्रस्तावित फेरबदल

| Regulation No. | Existing Provision | Regulation No. | Proposed Provision |
|---|---|---|---|
| 4.2.1 | Provided that,<br><br>the percentage of industrial activities shall not be less than 80% of the area of the total land and support uses shall not exceed 20% of the area of the total land. The percentage of uses to be allowed as support uses shall be as decided by the Authority. Recreational open space & amenity space, if applicable, shall be earmarked proportionately for industrial and support activity area. | 4.2.1 | Provided that the<br><br>*(A)* Percentage of industrial activities shall not be less than ***60%*** of the area of the total ***plotted*** land and support uses shall not exceed ***40%*** of the area of the total ***plotted*** land ***in MIDC Industrial Areas situated within Mumbai Metropolitan Region & Pune Metropolitan Region and other industrial areas situated within the Municipal Corporation limits.***<br><br>***(B) Percentage of industrial activities shall not be less than 70% of the area of the total plotted land and support uses shall not exceed 30% of the area of the total plotted land for Rest of the Maharashtra.***<br><br>The percentage of uses to be allowed as support uses shall be as decided by the Authority.<br><br>***The percentage of*** Recreational open space & amenity space, if applicable, shall be earmarked proportionately for industrial and support activity area. |

*******

| | | |
|---|---|---|
| **प्रादेशिक कार्यालय, ठाणे**-1<br>ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, 1 मजला, वागळे इस्टेट, ठाणे-400064. | **प्रादेशिक कार्यालय, ठाणे-२**<br>ऑफिस कॉम्प्लेक्स बिल्डींग, 1 मजला, वागळे इस्टेट, ठाणे-400064. | **प्रादेशिक कार्यालय, महापे**<br>ठाणे-बेलापूर रोड, लोकमत प्रेस मागे, महापे नवी-मुंबई-400710. |
| **प्रादेशिक कार्यालय, पनवेल**<br>खांदा कॉलनीच्या समोर, फ्लायओव्हर्स ब्रिज जवळ, नवी-पनवेल (प) जि.रायगड-410206. | **प्रादेशिक कार्यालय, रत्नागिरी**<br>मिरजोल औद्योगिक क्षेत्र, जे.के. फॉईलस जवळ रत्नागिरी-415639. | **प्रादेशिक कार्यालय, पुणे**-1<br>जॉग सेंटर, 2 रा मजला, जुना पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, पुणे-411003. |
| **प्रादेशिक कार्यालय, पुणे**-2 (**आयटी**)<br>जॉग सेंटर, 5वा मजला, जुना पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, पुणे-411003 | **प्रादेशिक कार्यालय, बारामती**<br>MIDC, CFC बिल्डिंग, पेन्सिल चौक, बारामती -413133. | **प्रादेशिक कार्यालय, सांगली**<br>उद्योग भवन, सरस्वती नगर, टाटा पेट्रोल पंपाच्या मागे, ता. मिरज, सांगली-416416 |
| **प्रादेशिक कार्यालय, सोलापुर**<br>सीएफसी इमारत, प्लॉट नं. पी-5,चिंचोली औद्योगिक क्षेत्र, चिंचोली, सोलापुर-413255 | **प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर**<br>उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, असेंब्ली रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर-416003 | **प्रादेशिक कार्यालय, सातारा**<br>एमआयडीसी, सीएफसी इमारत, पोस्ट ऑफिस जवळ, सातारा-415004 |
| **प्रादेशिक कार्यालय, नाशिक**<br>उद्योग भवन इमारत, 2 रा मजला, राठी चौक, आयटीआय सिग्नल जवळ, सातपुर, नाशिक-42207 | **प्रादेशिक कार्यालय, आहिल्यानगर**<br>सीएफसी इमारत, नव-नागपुर, एमआयडीसी, आहिल्यानगर-414111 | **प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**<br>एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र,रेल्वे स्टेशनजवळ, छत्रपती संभाजीनगर-431005 |
| **प्रादेशिक कार्यालय,धुळे**<br>उप विभाग कार्यालय समोर, एमआयडीसी, अति.धुळे एमआयडीसी, अवधान, धुळे-424006 | **प्रादेशिक कार्यालय,जळगाव**<br>एमआयडीसी, अजिंठा रोड, रेमंड चौक, जळगाव-425003. | **प्रादेशिक कार्यालय, लातुर**<br>सीएफसी एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र, लातुर-413531 |
| **प्रादेशिक कार्यालय,नांदेड**<br>उद्योग भवन, 2रा मजली, छत्रपती शिवाजी नगर, नांदेड-431602 | **प्रादेशिक कार्यालय,नागपुर**<br>उद्योग भवन, 5 वा मजला, सेल्स टेक्स इमारत समोर, सिव्हील लाईन्स, नागपुर-440001 | **प्रादेशिक कार्यालय,चंद्रपूर**<br>एमआयडीसी विश्रामगृह, घुग्गुस रोड, चंद्रपुर-442206 |

| | | |
|---|---|---|
| **प्रादेशिक कार्यालय, अमरावती**<br>एमआयडीसी औद्योगिक क्षेत्र<br>जुना बडनेरा बायपास रोड,<br>अमरावती-444607 | **प्रादेशिक कार्यालय**, अकोला<br>एमआयडीसी, अकोला<br>औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. 2,<br>मलकापूर, अकोला -444004 | **प्रादेशिक कार्यालय (आयटी)**, **मुंबई**<br>मऔविम (मुख्या.), उद्योग सारथी, महाकाली गुफा रोड, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पु) |